दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२९४ ■ शुक्रवार, दि. १४ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -294 ■ Friday, 14 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# राज्यातील हजारो कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार

## नागरिकांच्या घरासाठी प्रधानमंत्री आवास योजना २.० ची अंमलबजावणी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहरी भागातील गरजू लाभार्थ्यांना त्यांच्या स्वप्नातील हक्काचे घर मिळाले पाहिजे, या सामाजिक जबाबदारीसाठी प्रत्येक विभाग स्तरीय, शहर स्तरीय तांत्रिक तज्ज्ञ यांनी सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम करावे, असे आवाहन उपसचिव तथा प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० चे अभियान संचालक तथा राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणेचे मुख्य अधिकारी अजित कवडे त्यांनी केले.बीकेसी येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० संदर्भात कोकण विभागाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या घरांचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० ची अंमलबजावणी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये केंद्र शासनाने या नव्या टप्प्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या होत्या. त्यानंतर १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सह्याद्री येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावास




मंजुरी देण्यात आली.

घरकुलांसोबत पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते, वीजपुरवठा अशा मूलभूत सुविधा पुरविल्या जातील. तसेच, दिव्यांग व्यक्तींसाठी आवश्यक रॅम्प आणि सुविधा, आंगणवाड्या, पावसाचे पाणी साठवण्यासाठी यंत्रणा, सौर ऊर्जा प्रणाली आणि हरित क्षेत्रासाठी स्थानिक वृक्षांची लागवड या बाबींचाही समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) व नगरपरिषद प्रशासन संचालनालय (डीएमए) यांच्या समन्वयाने ही योजना राबवली जात असून आजपर्यंत राज्यात ४३,९८९ कुटुंबांची नोंदणी करण्यात आली आहे. राज्यातील हजारो कुटुंबांचे हक्काचे घराचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० एक महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. या कार्यशाळेस उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे, म्हाडाचे मुख्य अभियंता आडे, म्हाडाचे वित्त नियंत्रक अजयसिंग पवार, गृहनिर्माण विभागाचे अवर सचिव रवींद्र खेतले, वरिष्ठ सल्लागार मुकुल बापट, विभाग स्तरीय तसेच शहर स्तरीय तांत्रिक तज्ज्ञ आदी यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २०१५ पासून राज्यात राबविली जात आहे. राज्यातील ३९९ शहरांमध्ये या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, आतापर्यंत १४.७० लाख घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यापैकी ३.७९ लाख घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) ही योजना वरदान ठरली असून, आता २.० टप्प्यात आणखी सुधारित स्वरूपात घरे बांधण्यात येणार आहेत. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात ३० ते ४५ चौ. मी. पर्यंतच्या घरे अत्यल्प उत्पन्न गटासाठी (ईडब्ल्यूएस) बांधली जाणार आहेत. या घरांमध्ये शौचालय व इतर नागरी सुविधांचा समावेश असणार आहे. योजनेची अंमलबजावणी ही (१) वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधकाम (बीएलसी), (२) भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (एएचपी), (३) भाडे तत्वावर परवडणारी घरे (एआरएच) आणि (४) व्याज अनुदान योजना (आयएसएस) या चार प्रमुख घटकांद्वारे केली जाणार आहे.

## वीज तांत्रीक कामगारांच्या प्रश्नांवर लवकरच मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात येईल मुख्य अप्पर सचिव - श्रीमती अभा शुक्ला यांचे प्रतिपादन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्या खाली असलेले मेढा सौर उर्जा प्रकल्पाच्या बैठकी करिता शासनाच्या मुख्य अप्पर सचिव श्रीमती अभा शुक्ला या छत्रपती संभाजीनगर दौ-यावर आल्या असता महाराष्ट्र राज्य वीज तांत्रीक कामगार संघटनेचे सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने हॉटेल हयात पॅलेस येथे भेट घेऊन सत्कार केला.

खालील मुद्यांवर मंत्रालयात चर्चा होणार

या प्रसंगी वीज कर्मचा-यांच्या पगारवाढ कराराप्रसंगी संघटनेने तांत्रीक कामगारांच्या मांडलेल्या अॅनॉमली स्वतंत्र बैठक घेऊन सोडविण्याचे आश्वासन दिले होते त्या करिता तसेच महावितरण

कंपनीमधील वर्ग ४ च्या लाईनस्टाफला पगारवाढ करारात अॅडॉक दिलेले रु.१०००/- दिले ते वर्ग ३मध्ये गेल्यानंतर बंद होतात ते वर्ग ३ च्या लाईनस्टाफ कामगारांना लागू करणे, सरळ सेवा भरतीमध्ये वीज कर्मचा-यांच्या पाल्यांना आरक्षण मिळावे, तसेच ४० दिवसांमध्ये यू.पी.एस./एन.पी.एस.किंवा ६२४ कमांकचे ठरावानुसार वीज कामगारांच्या पेन्शनबाबत प्रस्ताव देणार होते,

महावितरण कंपनीतील ४०० उपकेंद्राना एम. पी. आर. मंजूर करणे, वीज कंपन्यातील कंत्राटी कामगारांना सरळ सेवा भरतीमध्ये प्राधान्य देणे आदी मागण्यांवर मंत्रालयात लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल असे आश्श्वासन मुख्य अप्पर सचिव, उर्जा श्रीमती अभा शुक्ला यांनी दिले, या प्रसंगी महाराष्ट्र शासनाचे तसेच मेढा प्रकल्पाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शिष्टमंडळात संघटनेचे सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन, उपसरचिटणीस कैलास गौरकर, कंत्राटी तांत्रीक कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष सादेजखान मियाँभाई झोन सं. सचिव विष्णू लोखंडे, नंदकिशोर लोखंडे यांची उपस्थिती होती.

## 'कंपाउंडर'कडून औषध घेतल्याने त्यांची पोटदुखी कधीच थांबणार नाही

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उबाठावर खरमरीत टीका

ठाणे : मराठी माणसाला तो पुरस्कार दिला त्याचा अभिमान पाहिजे, मात्र माझ्या द्वेषाने पछाडलेल्या लोकांनी महादजी शिंदे यांचा अपमान केला, साहित्यिकांचा अपमान केला आणि शरद पवार यांचाही अपमान केला. ही पोटदुखी कधीच थांबणार नाही कारण ते 'कंपाउंडर'कडून औषध घेतात त्यांना चांगल्या डॉक्टरकडे दाखवलं पाहिजे, अशी खरमरीत टीका शिवसेना मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. ठाण्यातील आनंद आश्रम येथे राजापूर लांजा मतदार संघाचे उबाठा गटाचे माजी आमदार राजन साळवी यांनी त्यांच्या शेकडो समर्थकांसह शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत शिंदे यांनी पुरस्कारांवर टीका करणाऱ्यांचा समाचार घेतला.

शिंदे म्हणाले की, एका मराठी माणसाचा मराठी माणसाकडून सत्कार केला तर त्यांना पोटदुखी झाली. त्या सोहळ्यात शरद पवार यांनी संस्कृती दाखवली आणि या लोकांनी विकृती दाखवली, अशी बोचरी टीका शिंदे यांनी संजय राऊतांवर केली. ज्याप्रमाणे मोघलांच्या घोड्यांना संताजी धनाजी दिसायचे तसे मी आता यांना दिसतोय. माझी लाईन कापण्यापेक्षा तुमची लाईन वाढवा. एकनाथ शिंदे जिथे उभा राहतो तिथून लाईन सुरु होते ती जनसेवेची लाईन असते. एक सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा राज्याचा मुख्यमंत्री होऊ शकतो हा इतिहास राज्याने पाहिला आहे. आमच्याकडे येताय त्यांचे आम्ही स्वागत करतोय पण तुमच्याकडून का जाताय याचा विचार करायला हवा, असे शिंदे म्हणाले. विकासाचा अजेंडा चालवला म्हणून राज्यातील जनतेने देदिप्यमान विजय मिळवून दिला. कोकण भगवमय झाले पाहिजे. बाळासाहेबांनी कोकणावर प्रेम केले. कोकणाचा राहिलेला विकास आपल्याला करायचा आहे, अशी ग्वाही शिंदे यांनी यावेळी दिली.

## अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**छत्रपती संभाजीनगर**

लिंबेजळगाव येथील विटभट्टीवर काम करणाऱ्या दाम्पत्याची मुलगी रुपाली संजय गायकवाड (वय १५ वर्षे) ही बेपत्ता झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याबाबत वाळूज पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविण्यात आली की, दि.२६ जानेवारी २०२४ रोजी सायं. साडेसहा वा. मंगल संजय गायकवाड मुळ गाव नेवासा जि. अहमदनगर यांची मुलगी पिण्याचे पाणी आणण्यासाठी गेली ती नंतर परतली नाही. याबाबत तिचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. म्हणून तक्रार नोंदविण्यात आली.

रुपाली हिचे वर्णन खालील प्रमाणे- रंग काळा सावळा, केस काळे व लांबट, बांधा सडपातळ, उंची साडेचार फुट,अंगात लाल रंगाचा टॉप, हिरव्या रंगाची बरमुडा पँट, गुलाबी ओढणी, पायात लाल रंगाची चप्पल, मराठी व अहिराणी भाषा बोलते. पोलीस उपनिरीक्षक एस.आर. दिलवाले हे अधिक तपास करीत आहेत.

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या आधुनिक इमारतीचे भूमिपूजन!

### पुढील ५० वर्षाचा विचार करून इमारतीचे बांधकाम होणार..

**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्याचे मुख्यमंत्री माननीय ना.श्री. देवेंद्रजी फडणवीसयांच्या उपस्थितीमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यम ातून राबवलेले पिंपरी-चिंवचड पोलिस आयुक्तालयाची इमारतीची पायाभरणी केली. तसेच अग्निशमन केंद्र आणि अन्य प्रकल्पाचेही भूमिपूजन झाले. या माध्यमातून सर्वात अत्याधुनिक पोलीस आयुक्तालय पिंपरी-चिंचवडमध्ये होणार आहे, विविध प्रकल्प लोकार्पण व भूमिपूजन सोहळ्याला माननीय उपमुख्यमंत्री ना.श्री.अजितदादा पवार साहेब, महसूल मंत्री ना.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, गृह राज्यमंत्री ना.श्री.योगेशजी कदम उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाची अत्याधुनिक इमारत जाधववाडी चिखली येथे ३.३९ हेक्टर जागेत उभारली जाणार आहे. तसेच देहूरोड पोलीस ठाण्याच्या परिसरात पोलिसांकरिता गेस्ट हाऊस उभारले जाणार आहे. महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या प्रशस्त इमारतीचे भूमिपूजन देखील मुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या हस्ते झाले. हे पोलीस ठाणे चाकण






इंडस्ट्रियल असोसिएशन मार्फत सीएसआर फंडातून १८.६६ कोटी रुपये खर्चून उभारले जाणार आहे..

या कार्यक्रमाच्या माध्यमातून सुमारे ७३० कोटी रुपयांचे विविध विकासकामे होणार आहेत. यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ४७५ कोटी आणि पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालयाचे १८० कोटी रुपये आणि पोलीस अधीक्षक कार्यालय इमारतीचे ६२ कोटी रुपयांची विविध विकासकामे करण्यात येत आहे. ही कामे दर्जेदार, आकर्षक व्हावीत याकरिता संकल्पना स्पर्धा घेण्यात येतात, यामधून उत्तम आराखड्याची निवड करण्यात येते. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यप्रणालीत वाढ होण्यासोबतच त्या इमारतीत नागरिकांना समाधान वाटले पाहिजे. यादृष्टीने आगामी ५० वर्षाचा विचार करुन अद्ययावत, इको फ्रेंडली इमारतीचे कामे करण्यात येत आहे.

पुणे शहरात ८७ कोटी रुपये खर्च करुन सारथीची इमारत पूर्ण करण्यात आली आहे. शिक्षण, कृषी, नोंदणी, कामगार, सहकार आणि पणन भवन, जमाबंदी आयुक्तालय, पुणे शहर पोलीस आयुक्तालय, सामाजिक आयुक्तालय, सारथी प्रादेशिक कार्यालय, येरवडा येथे न्यायालय, मनोरुग्णालय, नवीन मध्यवर्ती इमारत, बालेवाडी येथे ऑलम्पिक भवन तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका इमारत, न्यायालय, आदी इमारतीचे काम करण्यात येत आहे.

इमारतीचे कामे करताना जागेचा पुरेपूर वापर करुन जागा सपाटीकरण करुन वाहनतळ, स्वच्छ सूर्यप्रकाश, सौर ऊर्जा आदी सुविधा विचारात घेऊन दर्जेदार, टिकाऊ, हरित इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात लोकसंख्या वाढ होत आहेत, नागरिकांना पायाभूत सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत, यादृष्टीने काम करण्यात येत असल्याचे पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी सांगितले.

# जमनालाल बजाज: एक ख्यातनाम उद्योगपती!

## (जमनालालजी बजाज स्मृतिदिन)

जमनालालजी बजाज यांनी स्त्रीशिक्षणास अग्रक्रम देऊन स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता वर्धा येथे त्यांनी मारवाडी शिक्षण मंडळाची स्थापना केली. तसेच गांधींच्या मूलोद्योग शिक्षणावर भर दिला आणि राष्ट्रीयतेची भावना जोपासली व अस्पृश्यतानिवारणाचे महान कार्य अंगीकारले. त्यांनी खिलाफत चळवळीतही भाग घेतला होता. अखेरच्या दिवसांत सेवाग्राम आणि गोसेवासंघ या कार्यास त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. गांधीवादी मार्गाने स्वराज्य मिळेल, यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. म्हणूनच त्यांनी खादी, ग्रामोद्योग व गोसेवा यांचा पुरस्कार केला. त्यांच्याबद्दल महत्वपूर्ण संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी सदर लेखात मांडली आहे... संपादक.

जमनालालजी बजाज यांचा जन्म राजस्थानमधील सिकल जिल्ह्यातील कासी का बास या गावात दि.४ नोव्हेंबर १८८९ मध्ये झाला. अवघ्या चार वर्षांचे असताना वर्ध्याचे सेठ बच्छराज बजाज यांनी नातू म्हणून दत्तक घेतले. बच्छराज यांचा वर्धा शहर आणि विदर्भात कापसाच्या रुई गाठींचा व्यवसाय होता. जमनालालजी यांचा वयाच्या तेराव्या वर्षी जानकीदेवी यांच्यासोबत विवाह झाला. त्यावेळी बालविवाहाची प्रथा सर्वत्र प्रचलित होती. जमनालाल व जानकीदेवी या दाम्पत्याने पुढे मात्र या प्रथेविरोधात मारवाडी समाजासह इतर समाजासाठी कार्य केले. जमनालाल यांना बालपणापासूनच विलासी जीवन, श्रीमंती आवडत नसे, ते यात रमत नसत. राष्ट्रवाद त्यांच्या नसानसात वसत होता. लोकमान्य टिळकांच्या केसरीचे ते वाचक होते. १३ वर्षाच्या जमनालाल यांनी आपल्या पॉकेटमनीची बचत करून दान म्हणून १०० रुपये या वर्तमानपत्राला पाठविले होते. या काळातच ते गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील चळवळीविषयी आकर्षित झाले. जेव्हा गांधीजी भारतात आले तेव्हा जमनालाल त्यांच्याशी भेटले आणि सतत संपर्कात राहिले. गांधीजींना सन १९३४मध्ये वर्धा, सेवाग्राम येथे आणून कर्मभूमी करण्यास भाग पाडले. त्यासाठी त्यांनी सेवाग्राम व वर्धा येथील मोठी जागाही दिली.



- संकलन व शब्दांकन -
श्री एन. के. कुमार
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

जमनालाल बजाज हे एक गांधीवादी देशभक्त व बजाज उद्योगसमूहाचे प्रवर्तक होते. त्यांचा जन्म पूर्वीच्या जयपूर संस्थानातील कासीकाबास या खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. वडील कनिराम व आई बिरदीबाई होत. वयाच्या चौथ्या वर्षी जमनालाल वर्ध्याचे बच्छराज बजाज या लक्षाधीशाच्या घरात दत्तक गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण वर्धा येथे झाले. नंतर त्यांनी इंग्रजी, हिंदी, गुजराती या भाषा आत्मसात केल्या; पण कोणतीही पदवी त्यांनी घेतली नाही. विद्यार्थिदशेतच त्यांचा विवाह सन १९०२ साली इंदूर संस्थानातील जावरा येथील शेठ गिरधारीलाल जाजोदिया यांच्या जानकीदेवी या मुलीशी झाला. कमलनयन व रामकृष्ण हे त्यांचे दोन मुलगे. ते उद्योगपती म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांपैकी कमलनयन हे लोकसभेचे काही वर्षे सभासद होते, ते सन १९७२ मध्ये निवर्तले.

जमनालालजींनी स्त्रीशिक्षणास अग्रक्रम देऊन स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता वर्धा येथे त्यांनी मारवाडी शिक्षण मंडळाची स्थापना केली. तसेच गांधींच्या मूलोद्योग शिक्षणावर भर दिला आणि राष्ट्रीयतेची भावना जोपासली व अस्पृश्यतानिवारणाचे महान कार्य अंगीकारले. त्यांनी खिलाफत चळवळीतही भाग घेतला होता. अखेरच्या दिवसांत सेवाग्राम आणि गोसेवासंघ या कार्यास त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. गांधीवादी मार्गाने स्वराज्य मिळेल, यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. म्हणूनच त्यांनी खादी, ग्रामोद्योग व गोसेवा यांचा पुरस्कार केला. आधुनिक भारताच्या औद्योगिक क्षेत्रातही जमनालाल बजाज यांनी स्पृहणीय कामगिरी केली. त्यांनी १९२६ साली बजाज उद्योगसमूहाचा सुसंघटित पाया घातला आणि त्या उद्योगसमूहातर्फे पहिला साखर कारखाना सुरू केला; तथापि एक विश्वस्त म्हणूनच ते बजाज उद्योगसमूहाचे काम पाहत असत.

तरूणपणीच जमनालाल यांना लोकमान्य टिळक, पंडित मदनमोहन मालवीय, रवींद्रनाथ टागोर इ.थोर व्यक्तींचा सहवास लाभला. लोकमान्यांचा केसरी वृत्तपत्र ते लहानपणापासून वाचत. सन १९१५मध्ये गांधीजी दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावरून परत आल्यावर बजाज त्यांना भेटले. ते महात्माजींच्या विचारसरणीकडे आकृष्ट झाले आणि आपणास पाचवा मुलगा म्हणून स्वीकारावे, अशी त्यांनी सन १९२०मध्ये गांधीजींना विनंती केली. बच्छराज यांच्याकडून लाभलेल्या संपत्तीचा त्यांनी अपरिग्रह वृत्तीने केवळ एक विश्वस्त म्हणून सांभाळ केला. सन १९०८मध्ये जमनालाल मानसेवी दंडाधिकारी झाले. पुढे सन १९१८मध्ये त्यांना रायबहादूर हा किताब मिळाला. जमनालाल हे सन १९२० सालच्या नागपूर येथील अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष झाले. काँग्रेसचे खजिनदार म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. त्यांनी असहकार चळवळीत भाग घेऊन आचार्य विनोबा भावे यांच्या नेतृत्वाखाली वर्धा येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली आणि काँग्रेसच्या ठरावानुसार रायबहादूर या उपाधीचा त्याग त्याच साली केला. सन १९२३मध्ये त्यांनी नागपूर येथे राष्ट्रध्वज सत्याग्रहाचे नेतृत्व केले. त्याबद्दल त्यांना १८ महिन्यांची शिक्षा झाली. त्याच वर्षी गांधीजीचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांच्या अनुपस्थितीत गांधी

पान ४ वर

# प्रेमीयुगुलांसाठी प्रेमाचा उत्सव - व्हॅलेन्टाईन्स डे!

भारतात मोठ्या प्रमाणावर हा दिवस प्रेमीयुगलांकडून साजरा केला जातो. तथापि, 'व्हॅलेन्टाईन्स डे हा आपल्या संस्कृती विरुद्ध आहे' असे म्हणून भारतातील बजरंग दल व इतर कट्टरतावादी हिंदू धार्मिक संघटना याला विरोध करतात, असे असतानाही 'व्हॅलेंटाईन डे' भारतामध्ये जास्त प्रमाणात लोकप्रिय होत आहे. दरवर्षी 'व्हॅलेन्टाईन्स डे' हा प्रेम दिवस म्हणून १४ फेब्रुवारी रोजी जगभर साजरा केला जातो. हा एकप्रकारे प्रेमीयुगुलांसाठी प्रेमाचा आणि रोमांसचा अनोखा उत्सवच आहे. हा एक ख्रिश्चन सण सुद्धा आहे तसेच या दिवशी लोक त्यांच्या प्रियकर-प्रेयसी, जोडीदार किंवा आपल्या आवडत्या व्यक्तीला शुभेच्छा संदेश, फुले, सुंदर भेटवस्तू किंवा चॉकलेट पाठवून प्रेम व्यक्त करतात. या दिवसाची सुरूवात एका रोमन उत्सवापासून झाली. रोममध्ये उन्हाळ्याच्या दिवसांत 'लुपरकॅलिया' नावाचा उत्सव साजरा केला जायचा. या उत्सवात मुले बॉक्समधून मुलींच्या नावे काढत असत. उत्सवा दरम्यान ही जोडपी प्रेयसी-प्रियकर बनून फिरत असत आणि कधी-कधी ते लग्नबंधनात देखील बांधली जात. नंतर तेथील चर्च ख्रिश्चन उत्सव म्हणून आणि संत व्हॅलेंटाईनच्या स्मरणार्थ हा दिवस एखाद्या सणाप्रमाणे साजरा करण्यास सुरूवात केली. यानंतर लोक आपलं प्रेम व्यक्त करण्यासाठी सेंट व्हॅलेंटाईन नावाचा वापर करू लागले.

असं म्हणतात, प्रेम ही एक अशी भावना जी व्यक्त होताच चेहरा खुलतो, बहर येतो. तसं बघितलं तर प्रेमाची भावना व्यक्त करण्यासाठी कुठल्याही ठराविक वेळेची किंवा जागेची गरज नसते. ३६५ दिवस हे प्रेमाचेच असतात पण 'व्हॅलेंटाइन डे' की बात ही कुछ और ही है ! प्रेमाच्या या दिवसाने तरुणाईला वेड लावलं, असंही म्हटल्यास वावगं



ठरणार नाही. अगदी ठरवून या दिवशी कुणी प्रेमात पडत नाही, मात्र तरीही वर्षभर याची तयारी सुरू असते. सेंट व्हॅलेंटाइनने याला विरोध करून काही सैनिकांचा विवाह लावून दिला. आणखी एक जोड संत व्हॅलेंटाईनने ख्रिश्चन सैनिकांसाठी विवाह केले ज्यांना लग्न करण्यास मनाई होती. केलेडियसला हे समजल्यानंतर त्याने व्हॅलेंटाइनला तुरुंगात डांबलं. तुरुंगात असतानाच व्हॅलेंटाइनचा जीव जेलरच्या मुलीवर आला. प्रेम केल्याची शिक्षा म्हणून १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाइनला फाशी देण्यात आली होती. फाशीच्या आदल्या दिवशी व्हॅलेंटाइनने प्रेयसीला स्वाक्षरी केलेले पत्र लिहिले आणि पत्राचा शेवट 'युअर व्हॅलेंटाइन' असा केला. तेव्हापासूनच १४ फेब्रुवारीला हा दिवस साजरा केला जातो. व्हॅलेंटाईन डे सेंट व्हॅलेंटाईन नावाच्या ख्रिश्चन हुतात्म्यांच्या नावाने साजरा केला जातो. एका दंतकथेनुसार ख्रिश्चन संत व्हॅलेन्टाईनचा हा बलिदान दिवस आहे. परंतु युरोप मध्ये अजूनही संदिग्धता आहे की, नक्की कोणत्या व्हॅलेन्टाईन नावाच्या व्यक्तिपासून सुरुवात झाली. नंतरच्या काळात जगातील अनेक ठिकाणी प्रणय आणि प्रेमाचा एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक, धार्मिक आणि व्यावसायिक उत्सव बनला. सेंट व्हॅलेंटाईन बद्दल एकमत नसले तरी त्याबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत पण सर्वात लोकप्रिय कथा रोमन किंग क्लॉडियस आणि सेंट व्हॅलेंटाईन यांची आहे. क्लॉडियसने आपल्या सैनिकांना लग्न करण्यास मनाई केली होती, पण सेंट व्हॅलेंटाईनने अनेक सैनिकांना लग्नासाठी तयार केले आणि त्यांचे लग्न लावून दिले. राजाला राग अनावर झाल्याने त्याने १४ फेब्रुवारी २६९ रोजी संत व्हॅलेंटाईनला फाशीवर चढवलं.

पाश्चात्य ख्रिश्चन चर्च हे व्हॅलेन्टाईन डे १४ फेब्रुवारीला साजरा करतात आणि पूर्व सनातनी चर्च ६ जुलै/३० जुलै रोजी साजरा करतात. तिसऱ्या शतकात रोमन साम्राज्यात छळलेल्या ख्रिश्चनांची सेवा केल्याबद्दल रोमच्या सेंट व्हॅलेंटाईनला तुरुंगात टाकल्याच्या वृत्तासह, १४ फेब्रुवारीशी जोडलेल्या विविध व्हॅलेंटाईनशी संबंधित अनेक हौतात्म्य कथा आहेत. सुरुवातीच्या परंपरेनुसार, सेंट व्हॅलेंटाईनने त्याच्या जेलरच्या अंध मुलीला दृष्टी बहाल केली. दंतकथेतील नंतरच्या अनेक जोडांनी ते प्रेमाच्या थीमशी अधिक चांगले जोडले आहे. व्हॅलेंटाईनचा उत्सव पोप गेलेसियस-१ याने इ.स. ४९६ मध्ये स्थापन केला होता, जो रोमच्या संत व्हॅलेंटाईनच्या सन्मानार्थ १४ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, जो इ.स. २६९ मध्ये त्या तारखेला मरण पावला. हा दिवस १४ व्या आणि १५ व्या शतकात रोमँटिक प्रेमाशी जोडला गेला जेव्हा दरबारी प्रेमाच्या कल्पना फुलल्या, वरवर पाहता वसंत ऋतूच्या सुरुवातीच्या 'लव्हबर्ड्स'च्या सहवासामुळे. १८ व्या शतकातील इंग्लंडमध्ये हे अशा प्रसंगात वाढले, ज्यामध्ये जोडप्यांनी फुले सादर करून मिठाईची ऑफर देऊन आणि ग्रीटिंग कार्डे ('व्हॅलेंटाईन' म्हणून ओळखले जाते) पाठवून एकमेकांबद्दलचे प्रेम व्यक्त केले. आज वापरल्या जाणाऱ्या व्हॅलेंटाईन डे चिन्हांमध्ये हृदयाच्या आकाराची बाह्यरेखा, कबूतर आणि पंख असलेल्या कामदेवाची आकृती समाविष्ट आहे. १९ व्या शतकापासून हस्तलिखित व्हॅलेंटाईनने मोठ्या प्रमाणावर उत्पादित ग्रीटिंग कार्ड्सला मार्ग दिला आहे. इटलीमध्ये सेंट व्हॅलेंटाईन कीज प्रेमींना 'एक रोमँटिक प्रतीक आणि देणाऱ्याच्या हृदयाला अनलॉक करण्यासाठी आमंत्रण म्हणून' तसेच मुलांना अपस्मार (ज्याला सेंट व्हॅलेंटाईन मॅलाडी म्हणतात) पासून दूर ठेवण्यासाठी दिल्या जातात.

व्हॅलेंटाईन डे ची कोणत्याही देशात सार्वजनिक सुट्टी नाही, जरी तो अँग्लिकन कम्युनियन आणि लुथेरन चर्चमध्ये अधिकृत मेजवानीचा दिवस आहे. ईस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्चचे अनेक भाग ६ जुलै रोजी रोमन प्रेस्बिटर सेंट व्हॅलेंटाईनच्या सन्मानार्थ आणि ३० जुलै रोजी इंटरअम्ना (आधुनिक टर्नी) चे बिशप हायरोमार्टीर व्हॅलेंटाईन यांच्या सन्मानार्थ सेंट व्हॅलेंटाईन डे साजरा करतात. व्हॅलेंटाईन डे प्रथा ग्रीटिंग कार्ड पाठवणे, मिठाई आणि फुले सादर करणे. सुरुवातीच्या आधुनिक इंग्लंडमध्ये विकसित झाले आणि १९ व्या शतकात इंग्रजी भाषिक जगामध्ये पसरले. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २१ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, या प्रथा इतर देशांमध्ये पसरल्या, जसे की हॅलोवीन, किंवा ख्रिसमसच्या पैलूंपेक्षा, (जसे की सांताक्लॉज). हा दिवस अनेक पूर्व आशियाई देशांमध्ये साजरा केला जातो ज्यामध्ये सिंगापूर, चिनी आणि दक्षिण कोरियाचे लोक व्हॅलेंटाइनच्या भेटवस्तूंवर सर्वाधिक पैसे खर्च करतात.

आपण हा दिवस होममेड कार्ड, मिठाई, गुलाब, रोमँटिक डेट, मित्रांसमवेत वेळ घालवून साजरा करू शकतो आणि हा दिवस साजरा करण्याचे अजूनही बरेच मार्ग आहेत. आपण रोमँटिक डिनर किंवा लंचसाठी बाहेर जाऊ शकता किंवा कोणत्याही रोमँटिक ठिकाणी वेळ घालवू शकता. या दिवशी आपण आपल्या प्रियजनांना आवडत्या भेटवस्तू किंवा एखादा गोड पदार्थ देऊन नात्यातील स्नेह वाढवू शकता. या दिवशी एखाद्यावरील प्रेम व्यक्त करू शकता. व्हॅलेंटाईन डे मुलगा किंवा मुलगी कोणा एकासाठी नसून हा दिवस दोघांसाठी असतो. हा दिवस दोघेही साजरा करू शकतात. हा आनंदाचा किंवा प्रेमाचा उत्सव केवळ जोडप्यांसाठीच नव्हे तर मनातील प्रेमासाठी साजरा केला जातो आणि आपल्या मनातील ते प्रेम कोणासाठीही असू शकते. त्यामुळे हा दिवस तुम्ही आई-बाबा, भाऊ-बहिण, मित्रमैत्रीण कोणासाठीही साजरा करू शकता. आपल्या मनातील व्हॅलेंटाईन कोणीही असू शकतं. या दिवशी आपण आपल्या प्रियजनांना अनेक प्रकारचे प्रेमळ, रोमँटिक, सुंदर संदेश पाठवू शकता. असे संदेश जे प्रेमाची भावना व्यक्त करणारे किंवा या दिवसाचे महत्त्व सांगणारे असतात. सर्वांना व्हॅलेंटाईन डे च्या प्रेमळ शुभेच्छा !

- प्रवीण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अवकाशात

**कृत्रिम** बुद्धीमत्तेच्या अवकाशात अमेरिका आणि चीनसारखे तगडे देश आधीपासूनच स्थान राखून असताना पुढील सहा महिन्यांमध्ये भारतही त्यात प्रवेश करत असल्याची बातमी महत्त्वपूर्ण म्हणायला हवी. येणारे युग कृत्रिम बुद्धीमत्तेचे असल्याचे एव्हाना सिद्ध झाले आहे. त्यामुळेच भारत उपलब्ध यंत्रणेच्या पायावर या अवकाशातील आपले इमले रचतो की नव्याने पायाभरणी करतो, हे बघावे लागेल.

अमेरिका आणि चीनपाठोपाठ आता भारतही एआयच्या क्षेत्रामध्ये पाऊल ठेवत असल्याची बातमी अनेकार्थाने महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल. विशेषत: जगभर 'डिपसीक'चा बोलबाला असताना भारतीयांनी या बदलाचे महत्त्व आणि होणारे परिणाम जाणून घेणे गरजेचे आहे. अर्थातच त्यासाठी पार्श्वभूमी जाणून घेणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांमध्ये एआय अर्थात कृत्रीम बुद्धिमत्ता हा घटक सर्वसामान्यांच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. तो त्यांची अनेक कामे सोपी, सुलभ करत असल्याने याची उपयुक्तता आणि आवश्यकता सर्वसामान्यांना समजली आहे. दुसरीकडे, याविषयीची भीतीही बघायला मिळते. अनेकांचे रोजगार जातील का, हा प्रश्नही वारंवार विचारला जातो. मात्र या भीतीपोटी आता चॅटजीपीटीचा वापर थांबणे शक्य नाही. याद्वारे आपल्याला अत्यंत समर्पक उत्तरे मिळतात. केवळ माहितीच नव्हे तर जोडीला व्हीडिओ, ऑडिओ, प्रतिमा हे सगळेही मिळते. चॅटजीपीटीच्या या तंत्रज्ञानामागे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) नामक तंत्रज्ञान वापरले जाते. यातील तांत्रिकतेकडे न बघता अगदी सोप्या भाषेत सांगायचे, तर गुगलचे सर्च इंजिन आणि चॅटजीपीटी यातील फरक लक्षात घेता समजते की, सर्च इंजिनवर आपण आवश्यक ती माहिती पुरवण्याची मागणी नमूद करतो आणि त्यानुसार ते संबंधित माहिती पुरवते. मात्र चॅटजीपीटी वापरत असणाऱ्या एलएलएमकडून मिळालेल्या माहितीचे स्वरूप शब्द पुरवलेल्या मजकुराचे नसते, तर माणसाची नैसर्गिक भाषा अर्थात नॅचरल लँग्वेज प्रोसेसग समजून घेण्याची क्षमता या अत्याधुनिक तंत्रज्ञानात असते.



म्हणजेच एखाद्या माणसाला समजतो तसा त्याला विचारलेला प्रश्न समजतो आणि तो समजून माणूस उत्तर देईल, तशा प्रकारे आपल्याजवळ असणाऱ्या माहितीच्या ढिगाऱ्यातून बिनचूक माहिती तो समोर मांडतो. एलएलएमला हे महत्त्व असल्यामुळे तंत्रज्ञानातील नवीन टप्पा अर्थात जनरेटिव्ह एआय असे म्हणतात.

नवनिर्मिती करण्याची क्षमता त्याला वेगळे महत्त्व देऊन जाते. थोडक्यात, आपण याला अल्लाउद्दिनचा जादूचा दिवा म्हणू शकतो. असे हे ओपन एआयचे तंत्रज्ञान जगासमोर आणल्यानंतर लोक अक्षरश: चाट पडले होते, कारण आपल्यासमोर असे काही येईल, याची कल्पनाही त्यांनी केली नव्हती. पुढे याच धर्तीवर अल्फाबेट कंपनीचे जेमिनी, फेसबुकच्या मेटा कंपनीचे लामा असे तंत्रज्ञान समोर आले. त्यामुळे या क्षेत्रावर अमेरिकेचे मक्तेदार असल्याचे चित्रही स्पष्ट झाले. ते खरेही होते. या तंत्रज्ञानासाठी माहितीचे मोठमोठे ढीग उपसावे लागतात. त्यासाठी संगणकाची प्रचंड मोठी क्षमता वापरावी लागते.

सर्वसामान्यपणे संगणकाचे काम चालवण्यासाठी सेंट्रल प्रोसेसग युनिटचा वापर होतो. तो संगणकाचा मेंदू असतो. मात्र एआयमध्ये हा मेंदू पुरेसा ठरत नाही. म्हणूनच त्यासाठी विशिष्ट प्रकारची चीप वापरली जाते. त्याला ग्राफिकल प्रोसेसग युनिट (जीपीयू) असे म्हणतात. हे जीपीयू तयार करणारी अमेरिकेतील 'एनव्हिडिया' ही कंपनी असून तिची या कामात मक्तेदारी आहे. या चीपच्या बळावर सगळी कामे वेगाने केली जातात आणि म्हणूनच हे काम फक्त अमेरिकेतच होऊ शकते, असे समजले जात होते.

एआयमधील आपली एकाधिकारशाही टिकवण्यासाठी काही दिवसांपूर्वी अमेरिकेने या चीप्सच्या निर्मितीवर मर्यादा घातल्या होत्या आणि चीनला चीप्सची आयात करता येऊ नये, अशा प्रकारचे नियमही आणले होते. मात्र हे सगळे अडथळे पार करून त्यांच्या 'डिपसीक' या कंपनीने एका वर्षाच्या आत ओपनएआय, जेमिनी, लामा या सगळ्यांसारखे एलएलएम अत्यल्प खर्चामध्ये उभे करून दाखवले. त्याची क्षमता ओपनएआय वा वर उल्लेख केलेल्या कंपन्यांसारखीच आहे. त्यामुळेच चीनकडून पुढे आणल्या गेलेल्या या तंत्रज्ञानाने जगाला मोठा धक्का बसला. याचे जागतिक परिणामही बघायला मिळाले. अगदी सर्वसामान्य लोकही याचा विनामूल्य वापर करु शकणार असल्याने स्पर्धेला तोंड फुटल्याची भीती व्यक्त केली गेली.

कंपन्यांना ओपनएआयचा व्यावसायिक वापर करायचा असेल, तर पैसे भरावे लागतात. मेटाचे 'लामा' हे सॉफ्टवेअर मात्र फुकट आहे. त्याला ओपन सोर्स म्हटले जाते. आता डिपसीक कंपनीचे बाजारात आलेले एलएलएमही ओपन सोर्स असणे हादेखील एक मोठा आणि महत्त्वाचा घटक समजला गेला. त्यामुळेच चॅटजीपीटी वा जेमिनी या कंपन्यांना सॉफ्टवेअरमधून मिळणाऱ्या निधीला धोका पोहोचण्याची भीती वाढली आणि जागतिक पातळीवर त्याचे आर्थिक पडसाद बघायला मिळाले.

या सगळ्या पार्श्वभूमीवर सध्याच्या चर्चेप्रमाणे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) ची निर्मिती भारत नव्याने करणार आहे की त्यासाठी सध्या उपलब्ध असणारे तंत्रज्ञानच वापरणार, याची स्पष्टता अद्याप आलेली नाही. आहे ते तंत्रज्ञान वापरून भारत या क्षेत्रात उतरणार असेल तर हे इतके मोठे काम वा महत्त्वपूर्ण बाब वाटणार नाही. मात्र भारत नव्याने हे तंत्रज्ञान विकसित करणार असेल आणि भारताशी संबंधित असणाऱ्या गोष्टींसाठी त्याचा उपयोग होणार असेल तर निश्चितच त्याला खूप जास्त महत्त्व आहे. याकडे दोन अंगांनी बघावे लागेल.

एक म्हणजे याद्वारे भारताशी संबंधित अचूक माहिती मिळेल. जागतिक पातळीवरील लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रकारचे तपशील तितक्याशा मोठ्या प्रमाणात येत नाहीत. तुलना करायची झाल्यास जगाचा ज्ञानकोश आणि भारताचा ज्ञानकोश यात दिसते तसेच अंतर बघायला मिळेल. पण भारत आपल्यासाठी एआय च्या तंत्रज्ञानाची निर्मिती करेल तेव्हा भारताशी संबंधित सर्व छोटे-मोठे तपशील येऊ शकतील. अर्थातच ते स्थानिक व्यापार-उदिमसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर भारतातील कला, संस्कृती, इतिहास अशा बाबींची माहिती तिथे असेल तर सर्व प्रकारचे व्यवसाय, धंदे त्या आनुषंगाने आपला व्यवसाय पुढे नेऊ शकतात. त्या दृष्टीने सॉफ्टवेअर निर्माण करणे वा अशी कामे ते करु शकतात. भारतात येऊ पाहणाऱ्या विदेशी पर्यटकांनी या चॅटजीपीटीला भारताशी संबंधित प्रश्न विचारले, तर अधिक अचूक आणि परिपूर्ण माहिती मिळू शकते. या माध्यमातून ते हवा तेवढा तपशील मिळवू शकतात.

लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये माहितीचे साठे खूप मोठ्या प्रमाणावर असतात. पण याच्या जोडीला भारतात स्मॉल लँग्वेज मॉडेल्सही तयार होऊ शकतात. ती त्या त्या व्यवसायासाठी, राज्यासाठी वा अगदी गावासाठीही कामी येऊ शकतात, कारण विविध पातळ्यांवर बनवता येऊ शकतात. याला आपण फोकस लँग्वेज मॉडेलही म्हणू शकतो. पण त्याचबरोबर इथे केवळ फोकस माहितीच नव्हे तर, अन्य प्रकारेही कृत्रीम बुद्धिमत्ता मदत करु शकते. जसे की, हे तंत्रज्ञान विशेष मुलांसाठी कशा प्रकारची चित्रे आणि व्हीडिओ असू शकतात, हे बघून त्यानुसार संशोधन समोर मांडेल. थोडक्यात, अशा प्रकारचे अनेक प्रयोग करण्यास मोठा वाव आहे. स्थानिक पातळीपासून देशाच्या पातळीपर्यंत ते राबवता येऊ शकतात. पण त्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. आवश्यक तेवढा निधी आला पाहिजे. विशेष म्हणजे अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठी याचा वापर करुन घेता येतो, यासंबंधीची जाण लोकांमध्ये आली पाहिजे. अशा अंगांनी वापरल्यास हे तंत्रज्ञान लक्षणीय बदल घडवून आणू शकेल. एकदा हे साधले की जागतिक पातळीवरील व्यापारवृद्धीच्या संधी खुल्या होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

- अतुल कहाते

# सुशिक्षित सुसंस्कृत स्त्रीमन आविष्कारिका!

## (संजीवनी मराठे जयंती विशेष)

**संजीवनीजींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख व स्तुती करणे आवश्यक आहे. मुलांचे अनुभवविश्व साकार करण्याचे श्रेय त्यांनी प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊ न देता अस्सलपणे मिळविले. महाराष्ट्र शासनाने 'बरं का ग आई' व 'हसू बाई हसू' या त्यांच्या बालगीत संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला. त्यांच्या जयंतीनिमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा ज्ञानवर्धक लेख वाचकांच्या सेवेत... संपादक**

संजीवनी रामचंद्र मराठे या विशेषकरून गीतरचना व सुस्वर काव्यगायन यांसाठी मान्यता पावलेल्या एक आधुनिक मराठी कवयित्री. संजीवनीजींचा जन्म दि.१४ फेब्रुवारी १९१६ रोजी महाराष्ट्रातील पुणे या शहरात झाला. त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. शाळकरी वयातच त्यांनी कविता करावयास सुरुवात केली. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या त्या जीए-गृहीतागमा व एमए होत्या. आयुष्याच्या उत्तरार्धात त्या आणि त्यांचे पती खानापूर-बेळगाव सोडून सांगलीस गेले. सांगलीत राम मंदिराजवळच त्यांचा रामकृपा नावाचा बंगला होता. त्यांनी काही दिवस सांगलीच्या शाळेत शिक्षिकेचे काम केले. त्यांना मिना, भारती, अंजू या तीन मुली आणि प्रताप नावाचा मुलगा होता. प्रताप हा वैमानिक होता. अंजूने लग्नानंतर पाठविलेली पत्रे संजीवनीजींनी संपादित करून प्रकाशित केली. त्यांच्या रचनांचा सन १९३२मधील काव्य-संजीवनी हा त्यांचा पहिला संग्रह असला, तरी त्यांची रसिकांना खरी ओळख झाली ती राका या संग्रहातून- काव्य-संजीवनीतील निवडक रचनाही त्यात पुनर्मुद्रीत केलेल्या आहेत.

संजीवनीजींनी काव्यलेखनास प्रारंभ केला तो काळ तांबे व रविकिरण मंडळ यांच्या प्रभावाचा होता. साहजिकच तांबे यांच्या गीतशैलीची सार्वत्रिक मोहिनी आणि रविकिरण मंडळाने निर्माण केलेल्या काव्यगायनास अनुकूल असे वातावरण यांच्या संस्कारांतून त्यांची कविता गेय रूपात अवतरली. त्यांच्या गोड गळ्याची तिला उत्तम जोड मिळाली. रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याची मोहिनीही त्यांच्यावर होती. तांबे यांची जीवनसृष्टी, सौंदर्यशक्ती, तसेच शब्दकला, आविष्कराचे वळण यांचा संजीवनीजींच्या कवितेवरील संस्कार स्पष्ट आहे. तसेच मनोरमा रानडे यांच्या काव्यातून आधुनिक सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीमनाचा विशेषत: तिच्या प्रणयभावनेचा, जो एक सहजमोकळा आविष्कार घडण्यास प्रारंभ झाला होता. त्याची परंपराही त्यांच्या कवितेत पृथगामी स्वरूपात प्रवाहित झालेली दिसते. प्रणयानुभवातील तरल स्पंदने, त्याची स्वपनिलता, अलौकिकता व्यक्त करणारी त्यांची कविता अस्सलपणामुळे व वेगळेपणामुळे विशेष मनोवेधक ठरली. 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे?' हे गीत याचे उत्कृष्ट प्रातिनिधिक उदाहरण होय.

त्यानंतरच्या त्यांच्या कविता संसार, छाया, चित्रा व चंद्रफूल या कवितासंग्रहांतून प्रकाशित झाल्या. भावपुष्प व परिमला हे त्यांचे गीतसंग्रह होत. संजीवनी हा त्यांच्या निवडक कवितांचा संपादित संग्रह होय. तसेच काही बालगीतसंग्रह व लाडकी लेक ही अनुवादित बालकादंबरिका यांचाही त्यांच्या साहित्यसेवेत समावेश होतो. स्वप्नाळू प्रणयिनीचे व संसारी गृहिणीचे भावविश्व चित्रित करणारी त्यांची कविता प्राधान्याने स्वत:तच केंद्रित झाली आहे. आपल्या भाविश्वाचे भान विसरून स्वत:पलीकडच्या एखाद्या अनुभवाशी एकरूप झाल्याची 'एक सानशी कळशी' सारखी उदाहरणे मोजकी आहेत. आत्मप्रतीतीच्या परिघाबाहेर गेले, की त्यांची कविता सांकेतिक व क्षीण होते. हा राष्ट्रप्रेमाचा आविष्कार त्यांच्या रचनेतून स्पष्ट होतो.

संजीवनी मराठेंच्या काव्यातून प्रीतीच्या पृथगात्म चित्रणाच्या बरोबरीने सौंदर्यपूजक वृत्ती, सश्रद्धा, वात्सल्यादि स्त्रीसुलभ भाव इत्यादींचा आविष्कारही आढळतो. त्यांचे अनुभवविश्व तसे साधे, व्यापक व व्यामिश्रता या दृष्टीने मर्यादित असले तरी या कवयित्रीने आत्मप्रत्ययाशी व स्वत:च्या काव्यप्रकृतीशी प्रामाणिक राहून निर्मितीतील स्वत्व जपले, हे महत्त्वाचे! त्यांच्या अनुभवविश्वाला असलेला निरागसतेचा रंग हे त्याचे एक वेधक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या पुढील काळातील रचनांवर मराठी काव्यातील नवीन प्रवाह, स्थित्यंतरे यांचे बाह्य संस्कार झालेले दिसतात. यातून अनुभवातील अंतर्मुखता तसेच रचनेतील साक्षेप व संयम वाढलेला दिसला, तरी त्या कवितेचा गाभा तोच राहिला आहे. संजीवनीजींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख व स्तुती करणे आवश्यक आहे. मुलांचे अनुभवविश्व साकार करण्याचे श्रेय त्यांनी प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊ न देता अस्सलपणे मिळविले. महाराष्ट्र शासनाने 'बरं का ग आई' व 'हसू बाई हसू' या त्यांच्या बालगीत संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला.

संजीवनी मराठे यांचे महाराष्ट्रातील विद्येचे माहेरघर समजल्या जाणारे पुणे येथे दि.१ एप्रिल २००० रोजी निधन झाले.

!! जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

# म्हैसमाळ येथील गिरजादेवी यात्रेला सुरुवात, रेवड्यांची उधळण करीत भक्तांचा जयघोष

**खुलताबाद
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील-म्हैसमाळ येथील गिरजा देवीची सालाबादाप्रमाणे माघ पोर्णिमेला भरणारया यात्रेला बुधवारी (दि १२) सुरुवात झाली, यावेळी मंदिर विश्वस्त समिती अध्यक्ष तथा तसीलदार स्वरुप कंकाळ यांनी सपत्निक महापुजा केली. सदरील यात्रा तीन दिवस चालते.तालुक्यातील म्हैसमाळ येथे पुरातनकालीन गिरजा देवीचे मंदिर असुन, माघ पोर्णिमेनिमित्त भरणारया या यात्रेला राज्यभरात विखुरलेला लभाणी समाज दर्शनासाठी येतो.

या यात्रेत भाविक दर्शनानंतर नवस फेडण्यासाठी रेवड्यांची मुक्त उधळण करतात, त्यामुळे प्रसादाच्या दुकानां बरोबरच रेवड्यांची दुकानंही मोठ्या प्रमाणात असतात. जीर्णोध्दारानंतर प्रशस्त मंदिर गाभारा अन आकर्षक सभा मंडप-जीर्णोध्दारानंतर प्रशस्त मंदिर गाभारा - म्हैसमाळ येथील पुरातन कालीन मंदिर अगदीच छोटे होते.

त्यामुळे यात्रेदरम्यान भाविकांची मोठी कोंडी होत असे, मात्र आता या मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला असुन, प्रशस्त गर्भगृहासह आकर्षक सभानंडप बांधण्यात आला आहे.

म्हैसनाळ येथील गिरजा देवी मंदिरावर व परिसरात माघ पोर्णिमेनिमित्द आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

**दर्शनाची वाट बिकटच-** खुलताबाद-म्हैसमाळ रस्ता बांधणीचे काम संपता संपेना, या रस्त्याचे काम घाट मा त्या पर्यंत पुर्ण झाले असुन घाटमाथा ते गिरजा मंदिर ते दुरदर्शन मनोरा पर्यंतचा रस्ता पुर्णत:उखडलेल्या



अवस्थेत असुन वाट दर्शनाची बिकट असल्याचे चित्र आहे... विशेष म्हणजे मंदिरात एकाच रांगेतून महिला -पुरुष, वयोवृद्ध व लहान मुलांना सोडत असल्याने प्रचंड गर्दी होत असून भाविकांना सुरक्षारक्षक व सेवेकरी यांच्या अरेरावीला सामोरे जावे लागत आहे.

असे असतानाही ट्रस्ट फक्त बघ्याची भूमिका पार पाडताना दिसत असल्याने मंदिरात योग्य ते नियोजन करणे गरजेचे असल्याचे भाविकांकडून बोलले जात आहे.. गर्दीचा फायदा घेत चोर देखील आपला डाव साधत आहेत. अनेक भाविकांचे महागडे मोबाईल, मंगळसूत्र चोरीला गेले आहेत. मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे फक्त नावापुरते अनेक महिला भाविकाचे मंगळसूत्र चोरी.

# लोहमार्ग पोलीस कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे एका महिलाचे वाचवले प्राण



**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आज १२ फरवरी रोजी छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन येथे लोहमार्ग पोलीस कर्मचाऱ्यांची नियमितपणे चालू असताना गाडी क्रमांक १२०७२ शताब्दी एक्सप्रेस हे मुंबईकडे जात असताना हज - उमरा यात्रेसाठी औरंगाबाद येथून जनशताब्दी एक्सप्रेसमध्ये आपल्या मुलाला पवित्रब हज उमऱ्यासाठी श्रीमती बानोबी शेख रशीद या महिला सोडन्यासाठी आल्या होत्या अचानक जनशताब्दी एक्सप्रेस सुरू झाली. सदर महिला गाडीमध्येच राहिला होता घाई गडबड करीत उतरण्याच्या प्रयत्न करीत असताना झोकखाली झाल्याने ते ट्रेन खाली जात असताना लोहमार्ग पोलीस कर्मचारी अमलदार ज्ञानेश्वर शिरसागर, अश्रुबा गेजगे यांनी सतर्कता दाखवून धावत ट्रेन खाली जात असताना बाहेर खेचल्यामुळे महिलेचे प्राण वाचवले आहे. तसेच श्रीमती बानोबी शेख रशीद यांना काहीही दुखापत झालेली नाही त्यानंतर पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर शिरसागर, अश्रुबा गेजगे या पोलीस कर्मचाऱ्यांनी श्रीमती बनोबी त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले.

रेल्वे स्टेशन येथील समाजसेवक मुसाखान व अरफ खान यांनी लोहमार्ग पोलीस अमलदार ज्ञानेश्वर शिरसागर व अश्रुबा गेजगे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केलेले आहे.

पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर शिरसागर यांनी सांगितले की, आम्ही सकाळी नऊ वाजता रेल्वे स्टेशन येथे ड्युटी करत असताना आली होती श्रीमती बानोबी शेख रशीद हे आपल्या परिवारासह आपल्या मुलाला हज उमरासाठी जाणाऱ्या रेल्वे स्टेशनला सोडण्यात आले होते. परंतु ते गाडीमध्ये होते गाडीमध्ये असतात गाडी सुरू झाली घाई गडबडीत ते खाली उतरताना त्यांचा बॅलन्स आऊट झाला होता त्यामुळे ते खाली पडले आमची नजर पडताच आम्ही तिथे धावत जाऊन गाडी खाली जात असतं असलेल्या महिलेला आम्ही त्याचे प्राण वाचवले आहे. अतिशय आनंद होत असून आमच्याकडून हे चांगला काम झालेला आहे.

यावेळी पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी सर्व प्रवाशांना आवाहन केले आहे. की, वेळे अगोदर रेल्वे स्टेशनवर यावे नातेवाईकांना सोडण्यासाठी आलेल्या व्यक्तींनी गाडी निघण्याच्या अगोदरच खाली उतरणे आवश्यक आहे. रेल्वे गाडी हे रोजच येत असते परंतु आपले गेलेले प्राण परत येणार नाही.


# जैन टॅगतर्फे आयोजित 'स्वास्थम' या कार्यक्रमाला प्रतिसाद तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गेल्या काही वर्षात हृदयरोग आणि मधुमेहाचे प्रमाण वाढत आहे. सहज तपासणी केली आणि 'शुगर' जास्त आली तर रिपोर्ट चुकीचा आहे, कारण मला काहीही लक्षणे नाही, असे म्हटले जाते. परंतु लक्षणे नसतानाही मधुमेहाचा धोका असतो शिवाय कोणतीही लक्षणे आढळल्यावरही त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये, असा सल्ला मधुमेह आणि हृदयरोगतज्ज्ञांनी सोमवारी जैन टॅगतर्फे आयोजित 'स्वास्थम्' या कार्यक्रमात दिला.

शहरातील तापडिया नाट्यगृहात आयोजित या कार्यक्रमात बालमधुमेहतज्ज्ञ डॉ. अर्चना सारडा, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. मुकुंद बजाज, मधुमेहतज्ज्ञ डॉ. प्रवीण कल्याणकर, त्वचारोगतज्ज्ञ डॉ. प्रियंका कल्याणकर, आहारतज्ज्ञ डॉ. शिल्पा जोशी, ओरल सर्जन डॉ. अश्विनी अकोलकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. प्रवीण कल्याणकर यांनी हृदयरोग आणि मधुमेहाविषयी नागरिकांच्या मनातील प्रश्न विचारत डॉक्टरांना बोलते केले. डॉ. बजाज म्हणाले, छातीत दाब आल्यासारखे वाटणे, चक्कर येणे, थोडेही चालले तर दम लागणे याकडे दुर्लक्ष करू नये. डॉ. प्रियंका कल्याणकर म्हणाल्या, मानेवरील, काखेतील त्वचा जाडसर होणे, हाता-पायाला मुंग्या येणे, त्वचा कोरडी होणे, हे मधुमेहाच्या पूर्वी स्थितीमुळे होऊ शकते

**खूप भूक, वारंवार तहान?** - डॉ. अर्चना सारडा म्हणाल्या, देशातील १४ टक्के लोकांना मधुमेह आहे. मात्र, तपासणी न केलेले, प्रि-डायबेटिस रुग्णांचेही प्रमाण अधिक आहे. मला लक्षणे नाही,



म्हणजे मधुमेह नाही, असे नाही. लक्षणे नसली तरीही वर्षातून एकदा रक्त तपासणी करावी. वजन नियंत्रणात ठेवावे. खूप भूक, वारंवार तहान ही लक्षणे मधुमेहाची असू शकतात. डॉ. प्रियंका कल्याणकर म्हणाल्या, मानेवरील, काखेतील त्वचा जाडसर होणे, हाता-पायाला मुंग्या येणे, त्वचा कोरडी होणे, हे मधुमेहाच्या पूर्वी स्थितीमुळे होऊ शकते. याप्रसंगी न्या. के. यू, चांदीवाल, सोनाली पाटणी, सुनीता सेठिया,दिलीप कासलीवाल मोनटु कासलीवाल महावीर पाटणी, प्रकाश अजमेरा, प्रोजेक्ट चेअरमन दीपिका बडजाते, मोनिका चांदीवाल, डॉ. याशिका पांडे, रचना पहाडे, पूजा झांझरी, सीमा बडजाते, सारिका बडजाते, अध्यक्षा श्वेता कासलीवाल, उपाध्यक्ष पूर्वा कासलीवाल, सचिव जयश्री लोहाडे, कोषाध्यक्ष श्वेता गंगवाल, संस्थापक अध्यक्षा अनुपमा दगडा रिचा कासलीवाल, सिम्मी पहाडे, श्श्वेता सेठी, दिपाली पांडे, स्वाती कासलीवाल, नेत्रजा कासलीवाल, पुजा सेठी, किर्ती पाटणी, उज्वला पाटणी, सपना पाटणी, मिताली काला, छाया कासलीवाल, रिना ठोले उपस्थित होते. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.

# सामाजिक वनीकरण विभागाचा उपक्रम; वृक्ष उत्पादक व खरेदीदार मेळाव्यात ४४९ जणांचा सहभाग

**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने मंगळवारी (दि.१२) संत एकनाथ रंगमंदीर येथे वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात ४४९ जणांनी सहभाग घेतला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. वृक्ष लागवडीला चालना देऊन शेतकऱ्यांना त्याद्वारे उत्पन्न मिळावे हा हेतू या मागे होता. तथापि, वृक्ष लागवड होऊन पर्यावरणाचे संवर्धन होणे हा मुख्य हेतू होता.

वृक्ष शेतीचा मार्ग अवलंबून पर्जन्यमानावर अवलंबून असलेल्या शेतीतील उत्पन्नाची शाश्वतता टिकवणे तसेच पर्यावरणाचे संतूलनही टीकवणे हा या आयोजनामागील उद्देश होय. कोणताही व्यवसाय हा किमान किफायतशीर हवा हे बाजाराचे सूत्र आहे. त्यासाठी वृक्ष लागवड करणारे शेतकरी आणि त्या वृक्ष शेतीतून मिळणारे उत्पन्नाला उपलब्ध असणारी बाजारपेठ याचा समन्वय या आयोजनातून घालून देण्यात आला. विभागीय असणाऱ्या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २०७, जालना जिल्ह्यातील ६३, परभणी जिल्ह्यातील ५५, हिंगोली जिल्ह्यातील ३७ असे एकूण ३६२ वनशेती करणारे शेतकरी



सहभागी होते. तर उर्वरीत वृक्ष खरेदीदार कंपन्यांचे संचालक व शासकीय प्रतिनिधी उपस्थित होते.


मिट्कॉन नेचर बेस्ड सोल्युशन्सचे भगतसिंग शेळके,जे.के.पेपर लि. चे संदीप घाटे, नेटीव्ह कोनबॅक बांबू प्रोड्क्टसचे संजीव करपे, इंदुराव सँडल प्रोडक्ट्सचे राजेंद्र गाडेकर, महाराष्ट्र बांबू विकास मंडळाचे सी.यु. मराडे, फळ संशोधन केंद्राचे वरिष्ठ शासत्रज्ञ डॉ. संजय पाटील इ. तज्ज्ञ व महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर, जैन टिश्यु कल्चर, जैन हायटेक प्लांट फॅक्ट्री, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जैन ठिबक, जैन सोलार, ग्रीन सेन्स एनर्जी सिस्टीम्स, ग्रीन सेन्स सोलार वॉटर हिटर, महात्मा गांधी मिशन कृषी विज्ञान केंद्र, गांधेली अशा विविध संस्थांनी आपले स्टॉल्सही या कार्यक्रमात आणले होते. कृषी विभागाच्या कृषी वानिकी योजना, बांबू उद्योगातील संधी, पेपर उद्योगातील संधी, चंदन शेती व बाजारपेठेतील संधी, वृक्ष लागवड, बाजारपेठ व निर्यात संधी अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तएच केशर आंबा गुणवत्ता केंद्र हिमायत बाग , एमजीएम च्या गांधेली येथील कृषी विज्ञान केंद्रास शेतकऱ्यांनी क्षेत्रभेटीही दिल्या.

विभागीय वनअधिकारी सामाजिक वनीकरण श्रीमती कीर्ती जमदाडे कोकाटे यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. याद्वारे शाश्वत शेती आणि पर्यावरण संवर्धन अशा दोन्ही उद्दिष्टांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल नक्कीच चांगले पडले आहे.

# पळसवाडी गावांजवळ अपघात,दोघांचा मृत्यु

**खुलताबाद
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

धुळे सोलापूर महामार्गावर रविवारी (दि.नऊ) सकाळी सहा वाजायच्या सुमारास खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी गावाजवळ अपघात होवुन त्यात दोन जणांचा मृत्यू तर एक जखमी झाल्याची घटना घडली. या बाबत अधिक माहिती अशी रविवारी (दि.नऊ) सकाळी सहा वाजायच्या सुमारास छत्रपती संभाजीनगरकडून कन्नडकडे जाणाऱ्या छोटा हत्ती लोडिंग वाहन क्रमांक एम.एच.०४ एच.डी.३०४९ याने रस्त्यावर नादुरुस्त



असलेल्या ट्रॅक्टरला भरधाव वेगात पाठीमागून जोराची धडक दिल्याने छोटा हत्तीं ने अचानक पेट घेतला,यात वाहन चालक विनायक पाटील वय ३५ वर्षे रा.अंजनी ता.तासगांव जि.सांगली हे गाडीमध्ये अडकून जळून त्यांचा मृत्यू झाला.या अपघातात चालकासोबत बसलेला दादासाहेब देशमुख वय ३५ वर्ष रा.शिंदे मळा, अजनी ता. तासगांव,जि.सांगली ह्याचा उपचारादरम्यान छत्रपती संभाजीनगर घाटी रुग्णालय येथे मृत्यू झाला.सलीम मुल्लानी वय अंदाजे ४० हा गंभीर जखमी आहे, अशी माहिती महामार्ग वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल लोखंडे यांनी दिली.या अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांचे सह महामार्ग पोलीस निरीक्षक राहुल लोखंडे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार नरोटे, खुलताबाद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस पी टी बनसोडे. विकास चंदनसे, शांताराम सोनवणे, शरद दळवी, संतोष ठेगडे यांनी धाव घेतली.

## महिला सक्षमीकरण अभियान; महिला अधिकाऱ्यांची कार्यशाळा

# 'विधवा' नव्हे 'पुर्णांगिनी' म्हणा- रुपाली चाकणकर

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पती सोबत संसार करतांना ती 'अर्धांगिनी' असते मात्र पतीच्या निधनानंतर ती एकटीच दोघांचीही जबाबदारी सांभाळते. त्यामुळे तिला 'विधवा' न म्हणता 'पुर्णांगिनी' म्हणा आणि तिचा सन्मान करावा,असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती रुपाली चाकणकर ह्यांनी आज येथे केले. संबोधनातील हा बदल करण्यासंदर्भात राज्य महिला आयोगाने शासनाला शिफारसही केली आहे,असेही यावेळी श्रीमती चाकणकर यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा महिला व बालविकास विभाग यांच्या वतीने जिल्ह्यात 'महिला सक्षमीकरण अभियान' राबविण्यात येत आहे. त्याअभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात 'महिला अधिकाऱ्यांची कार्यशाळा' आयोजीत करण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्घाटन श्रीमती रुपाली चाकणकर यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, संगिता राठोड, नीलम बाफना, महिला व बालविकास अधिकारी रेश्मा चिमंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुवर्णा जाधव तसेच सर्व शासकीय विभागातील महिला अधिकारी उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनाने कार्यशाळेची सुरुवात झाली.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या की, महिलांनी स्वतःला आर्थिक आणि आरोग्यदृष्ट्या सक्षम ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या. उगाचच उपवास करु नका. आपण प्रशासकीय यंत्रणेतील घटक म्हणून समाजाला बांधील आहोत. आपण आपल्या पदावर काम करतांना सोबतच्या महिलांना जागरुक करु शकतो. असे करत असतांना समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.



श्रीमती चाकणकर पुढे म्हणाल्या की, समाजात आजही विधवा महिलांना अवहेलना सहन करावी लागते.

वास्तविक विधवा महिला ह्या आपल्या कुटुंबात आई आणि वडील अशा दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडत असतात. त्यामुळे त्यांना अधिक सन्मान दिला पाहिजे. राज्य महिला आयोगाने विधवा हा शब्द हटवून त्या ऐवजी 'पुर्णांगिनी' हा शब्द वापरावा अशी शिफारस शासनाला केली आहे.

समाजाचा हा दृष्टीकोन बदलविण्याचा सावित्रीमाईनी सुरु केलेला हा लढा अजूनही अपूर्ण आहे, तो आपल्याला पूर्ण करावयाचा आहे. समाज बदलासाठी महिला अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. महिलांनी आपले आयुष्य सकारात्मकतेने जगा,असे आवाहनही त्यांनी उपस्थित महिलांना केले.

त्यांनी महिला अधिकाऱ्यांना सांगितले की, बालविवाह, गर्भलिंगनिदान चाचण्या, विधवाप्रथा विरोधात लढा द्या.आपल्या कार्यालयातील अंतर्गत तक्रार निवारण समिती तयार करण्याबाबत आग्रही रहा. भारतीय न्याय संहिता या १ जून २०२४ पासून अंमलात आलेल्या कायद्यांसंदर्भात माहिती जाणून घ्या. ही माहिती शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचवा.विविध शासकीय योजना, टोल फ्री क्रमांक याबाबत जनजागृती करा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानानुसार त्यांनी आपल्याला दिलेला आत्म सन्मान, कायदा, हक्क, अधिकार समजून घेऊन सक्षम व्हा. आयुष्यातील संकटांच्या लढाईला सामोरे जा. स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या, असा हितोपदेशही श्रीमती चाकणकर यांनी उपस्थित महिला अधिकाऱ्यांना केला.

जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना ह्यांनी जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध महिला सक्षमीकरण उपाययोजनांबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, जिल्ह्यात महिला सुरक्षिततेसाठी ५०० हून अधिक शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

महिला बचत गटांमार्फत महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात ६५ हजार महिला ह्या लखपती दिली झाल्या आहेत.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, महिलांनी अपप्रवृत्तीच्या विरोधात उभे रहायला शिकावे व प्रवृत्त व्हावे, यासाठी महिला सक्षमीकरण अभियान आहे. त्याची सुरुवात शासकीय महिला अधिकाऱ्यांपासून व्हावी यासाठी ही कार्यशाळा आहे.

महिलांची सुरक्षितता, त्यांचे सक्षमीकरण याबाबतच्या उपाययोजनांची माहिती सर्व महिला अधिकाऱ्यांना हवी. त्यांची स्वतःची नोकरी व कुटुंब सांभाळतांना आपल्या पदाच्या माध्यमातून संपर्कात येणाऱ्या महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा.

प्रास्ताविक श्रीमती रेश्मा चिमंद्रे यांनी केले. सुत्रसंचालन श्रीमती प्रविणा कन्नडकर यांनी केले. दिवसभर चालणाऱ्या कार्यशाळेत डॉ. समिना पठाण यांनी महिलांचे आरोग्य व घ्यावयाची काळजी, अॅड. शुभांगी वक्ते यांचे महिलांविषयक कायद्यांची अंमलबजावणी, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य व ताणतणाव व्यवस्थापन, श्रीमती गीता बागवडे यांचे महिला सुरक्षितता- समस्या व उपाययोजना , श्रीमती रेश्मा चिमंद्रे यांचे महिलांसाठीच्या विविध योजना व अंमलबजावणी याविषयावर विविध सत्रात मार्गदर्शन होणार आहे.

## राज्य महिला आयोग अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांच्याकडून घृष्णेश्वराला अभिषेक



**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तालुक्यातील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिराच्या दर्शन घेतले विशेष म्हणजे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर दोन दिवसाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा दौऱ्यावर  महिला अधिकाऱ्यांची कार्यशाळा,आढावा बैठकीच्या संदर्भात आले होते. यानिमित्ताने रूपाली चाकणकर आज गुरुवारी संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास खुलताबाद तालुक्यातील वेरूळ  येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिराचे दर्शन घेतले यावेळी त्यांचे सोबत महिला जिल्हाध्यक्ष स्वातीताई कोल्हे जिल्हा सरचिटणीस अनिताताई बोरसे व महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. चाकणकर यांनी गुरुवारी (दि.१३) सायंकाळी वेरुळचा दौरा करीत १२ वे ज्योतिर्लिंग श्री.घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेवुन अभिषेक केला.

याप्रसंगी मंदिर देवस्थान समितीच्या वतीने गणेश बाबरेकर यांनी शालू श्रीफळ देऊन सत्कार केले. त्यांच्यासोबत  राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्षा स्वाती कोल्हे,जिल्हा सरचिटणीस अनिता बोरसे यांनी स्वागत केले.यावेळी त्यांच्या समवेत महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# किनवट येथे १५ आणि १६ फेब्रुवारी रोजी जागतिक बौद्ध धम्म परिषद

## भीमराव आंबेडकर, सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाठ, जिग्रेश मेवानी यांची उपस्थिती

**किनवट प्रतिनिधी**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समता नगर येथील बौद्धमूर्ती परिसरात दि १५ व १६ असे दोन दिवस १४ व्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे भव्य स्वरूपात आयोजन केले असून या परिषदेला देश-विदेशातील भन्ते,भाबौमसचे कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर,सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाठ, आ. भीमराव केराम आमदार हेमंत पाटील, मंत्री इंद्रनील नाईक उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त रात्री ९ वा.ख्यातनाम गायक अजय देहाडे मंजुषा शिंदे भाग्यश्री इंगळे संविधान मनोहरे रेश्मा सोनवणे यांचा बुद्ध भीम गीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम होणार आहे या धम्म परिषदेला पंचक्रोशीतील नागरिकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक दया भाऊ पाटील, निमंत्रक विशाल हलवले यांनी केले आहे.

दिनांक १५ फेब्रुवारी रोजी दु.४ वा.भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल  राष्ट्रीय अध्यक्ष जोगेंद्र कवाडे,प्रा डॉ मोहन मोरे दराटीकर,बापूराव गजभारे, विनोद भरणे मिलिंद धुळे मारोती भगत हे उपस्थिती राहतील.सायं ६ते रात्री ८ वाजेपर्यंत  धम्मदेशना, धम्मकवी संमेलन व धम्म संवाद कार्यक्रम संपन्न होतील रात्री ९ वा धम्म संस्कृतिक संध्या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या नामांकित गायिका रेश्मा सोनवणे संविधान मनोहरे व प्रशांत दामोदर यांचा बुद्ध भीम गीतांचा दणदणीत कार्यक्रम होईल. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वा. धम्म सवाल, १२ वा  भदंत संघरत्न महाथेरो हे धम्मदेशनात देतील.त्यानंतर धम्मसंगती प्रबोधन स्पर्धा होणार असून यात १२ ते २० वर्षे वयोगटातील मुला मुलींना सहभागी होता येईल सायं ५:३० वा आंबेडकरी कार्यकर्त्यांचा अनन्य सन्मान व सत्कार कार्यक्रमात राज्याचे सामाजिक न्यायमंत्री ना.संजय शिरसाठ आमदार भीमराव केराम व मेहकर विधानसभेचे आमदार सिद्धार्थ खरात, गुजरात येथील वडगाम विधानसभेचे आमदार जिग्नेश मेवाणी पद्मश्री कल्पना सरोज लघु विकास महामंडळाचे उपाध्यक्ष जयदीप जोगेंद्र कवाडे यांचा यथोचित सत्कार होईल




सायं ७:३० वा.समारोपीय सत्रात उमरखेडचे माजी आमदार विजयराव खडसे विधान परिषदेचे अध्यक्ष हेमंतभाऊ पाटील, राज्यमंत्री इंद्रनील नाईक माजी ऊर्जामंत्री नितीन राऊत आमदार प्रताप पाटील चिखलीकर कळमनुरीचे आमदार संतोष बांगर आमदार राजू तोडसाम आमदार बालाजी कल्याणकर आमदार श्रीजया चव्हाण आमदार बाबुराव कदम कोहळीकर तेलंगणाचे आमदार आमशा पाडवी, विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी डॉ. अंकुश देवसरकर शिवसेनेचे ज्योतिबा खराटे माजी नगराध्यक्ष अरुण आळणे,स्वागत आयनेनीवार यांची उपस्थिती राहणार आहे. रात्री ९ वा धम्म संस्कृतिक संध्या कार्यक्रमात मंजुषा शिंदे अजय देहाडे भाग्यश्री इंगळे यांचा बुद्ध भीम गीताचा प्रबोधनात्मक  कार्यक्रम होईल. या धम्म परिषदेत हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीचे दयाभाऊ पाटील, विशाल हलवले,निखिल कावळे राहुल सर्पे,दीपकदादा ओंकार सुनील भरणे, दिलीप मुनेश्वर, गोलू आढागळे, संदीप दोराटे, अरुण शेंद्रे, निवेदक कानींदे आदींनी केले आहे.

पान २ वरून

# जमनालाल बजाज: एक ख्यातनाम उद्योगपती!

सेवकसंघाची त्यांनी स्थापना केली. सन १९२४मध्ये ते नागपूर प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष व १९२५ मध्ये चरखा संघाचे खजिनदार होते. त्यांनी समाजसेवेसाठी अनेक संस्था स्थापन केल्या आणि अस्पृश्यतानिवारण, गोवर्धन, शिक्षणसंस्था यांसाठी भरीव आर्थिक मदत केली. अनेक संस्थांचे ते अध्यक्ष व सचिव होते. सस्ता साहित्य मंडळ याद्वारे त्यांनी राष्ट्रीय हिंदी साहित्य प्रकाशित केले. सन १९३८मध्ये अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. कॉंग्रेसच्या अस्पृश्यतानिवारण मोहिमेत त्यांनी सचिव या नात्याने पुढाकार घेऊन अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रचार केला आणि सन १९२८मध्ये वर्ध्याचे स्वतःच्या मालकीचे लक्ष्मीनारायण मंदिर हरिजनांना खुले केले. सन १९३०साली विलेपार्ले, मुंबई येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. या प्रसंगी त्यांच्या पत्नी जानकीदेवी व मुलगा कमलनयन यांनाही शिक्षा झाल्या. जमनालाल यांनी वर्ध्याजवळील सेगाव हे खेडे व तेथील जमीन गांधीना दिली. तेथे गांधीनी १९३६साली सेवाग्राम आश्रम स्थापन केला. जयपूरच्या संस्थानी प्रजेस राजकीय हक्क मिळावेत, म्हणून त्यांनी सत्याग्रह केला. त्यात त्यांना पुन्हा १९३९ मध्ये शिक्षा झाली. दुसऱ्या महायुद्धकाळात १९४१मध्ये  युद्धविरोधी प्रचारांमुळे त्यांना अटक झाली. वर्धा येथे गोसेवा संघाची स्थापना त्यांनी केली होती. त्यांना रक्तदाबाचा विकार होता; त्यातच रक्तस्त्राव होऊन ते दि.११ फेब्रुवारी १९४२ रोजी निधन पावले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ अनेक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यांचे पुत्र रामकृष्ण यांनी जमनालाल प्रतिष्ठान स्थापन केले. त्याच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष भारताचे उपराष्ट्रपती असून रामकृष्ण बजाज हे अध्यक्ष आहेत. भारतातील ग्रामीण भागात विशेष सेवा करणाऱ्या मान्यवर व्यक्ती व संस्था यांना त्याद्वारे पुरस्कार देण्यात येतात.

!! जमनालालजी बजाज यांना लेखरूपी पुण्यस्मरणाने विनम्र अभिवादन !!

# कल्पेश रूपेकर याच्या हत्येचा मुख्य सूत्रधारांवर खुनाचा गुन्हा दाखल करा

## रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षाची पोलिस उपायुक्त यांच्याकडे मागणी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षाच्या वतीने आज पोलीस उपायुक्त  नितीन बगाटे साहेब यांची आर पि एम  पक्षाचे पक्ष प्रमुख राजू भाई साबळे यांनी भेट घेवून २ फेब्रुवारी रोजी क्रांती चौक पोलीस ठाण्या समोर कल्पेश विजय रूपेकर या तरुणाची काही जणांनी हत्या केली होती.

त्या संदर्भात या हत्येचा मुख्य सूत्रधार कुणाल मराठे याने वैभव मालोदे याला मध्यस्थीने कल्पेश रुपेकर याला व्याजाने पैसे दिले होतेव त्या पैशासाठी कल्पेशला १ फेब्रुवारी  मराठे याच्या सांगण्यावरून वैभव मालोदे याने जय टॉवर येथून सायंकाळी साडे सातच्या दरम्यान त्याला उचलून रात्रभर त्याला त्रास देत देत फिरवले व रात्री १० वाजता कल्पेशने आपल्या आईला फोन करून सांगितले की मला दमदाटी करून वैभव मालोदे व त्याच्या मित्रांनी मला त्याच्या गाडीवर बसुन बाहेर आणले आहे असे त्याने सांगितले. आरोपीने रात्रभर घेवून फिरवले तसेच घटनेच्या दिवशी कल्पेशला मारहाण केली.दरम्यान  मराठे  हा मालोदे यास फोनवर बोलत होता आणि त्यादरम्यान स्वतः कुणाल मराठे हा तेथे आला व त्याच्या म्हणण्यानुसार कल्पेशचा खून झाला अशी कल्पेशच्या कुटुंबीयांची खात्री झाल्याबाबत त्यांचे म्हणणे असून  मराठे याच्यावर सुद्धा मुख्य सूत्रधार असल्याकारणाने खुनाचा व सावकारीचा गुन्हा नोंदवावा कारण कुणाल मराठे याने दिलेल्या व्याजाच्या पैशापोटीच सदरचे प्रकरण घडले अशी कल्पेशच्या कुटुंबियांची खात्री झाली असून , आरोपीचे व कुणाल मराठे यांचे कॉल डिटेल्स व CDR काढण्यात यावेत व तात्काळ कुणाल मराठे याच्यावर खुनाचा व सावकारीचा गुन्हा नोंदवून त्यास अटक करावी अन्यथा कल्पेशचं कुटुंब पोलीस स्टेशन समोर आत्मदहन करणार असे पोलीस उपायुक्त यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे या शिष्टमंडळात पक्षाचे राज्य उपाध्यक्ष अॅड.अविनाश थिट्टे राज्य सचिव सुरेश शिनगारे राज्य कार्याध्यक्ष सुनिल कोतकर मराठवाडा उपाध्यक्ष सुनिल खरात शहर अध्यक्ष रणजीत मनोरे पूर्व शहर अध्यक्ष रवी मोरे विकास साबळे शेख जाकेर राहुल घोरपडे व पीडित कुटुंब सहभागी होते.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून  शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816